स्वातंत्र्याची घंटी वाचवणे

मार्टी रोड्स फिगले

मराठी: अश्विनी बर्वे



स्वातंत्र्याची घंटी वाचवणे





“हुट हु हु!"

अकरा वर्षाच्या जॉनी मिकलीने आपल्या वडिलांच्या घोड्याची लगाम झटकले.


तो फिलाडेल्फियाला जाण्यासाठी रस्त्यावरून प्रवास करण्यास उत्साहित होते.

आज सकाळी तो अमेरिकी रहिवाश्यांची स राजधानी बघणार होता.

जॉनी आपल्या परिवाराबरोबर पेंसिल्वेनियाच्या नॉर्थम्प्टन टाउनमध्ये राहत होता.

महिन्यांतून एकदा त्याचे वडील शेतातले सामान विकण्यासाठी शहरात जात असत.

यावेळी, जॉन मिकलीने आपल्या मुलाला बरोबर येण्यास सांगितले.



एक वर्षापूर्वी अमेरिकी नेता फिलाडेल्फियामध्ये जमा झाले होते.

ते वसाहतवाल्यांचे भविष्य ठरवण्यासाठी तिथे भेटले होते.

अमेरिकी रहिवाश्यावर ग्रेट ब्रिटनच्या राजाचे शासन होते.

पण काही वसाहतींना आता ब्रिटनच्या राजाचे आदेश पाळण्याची इच्छा नव्हती.

फिलाडेल्फियामध्ये, अमेरिकी नेत्यांनी स्वतंत्रतेच्या घोषणेवर हस्ताक्षर केले.

घोषणापत्रामुळे जगाला सांगितले की अमेरिका आता इंग्लडपासून स्वतंत्र होण्याची इच्छा आहे.

अमेरिकी लोक आपल्या स्वातंत्र्यासाठी युद्ध लढत होते.

जॉनीची इच्छा होती की त्यानेही युद्धात लढावे.

त्याला वाटे की एका शेतकऱ्याच्या मुला ऐवजी त्याने एक नायक व्हावे.

जेव्हा ते फिलाडेल्फियाला पोहचले तेव्हा जॉनीच्या वडिलांनी लगाम हातात घेतले.

शहरातले रस्ते फॅन्सी आणि साध्या कपडे घातलेल्या लोकांनी भरलेले होते.

जॉन मिकलीने एक मोठ्या विटेच्या इमारतीकडे बोट दाखवले.

“ते स्टेटहाउस आहे बाळा,” ते म्हणाले.


तेव्हा जॉनीने एका मोठ्या घंटेचा आवाज ऐकला.

ती स्टेटहाउसची घंटा ‘स्वातंत्र्या’ ची होती.’

जॉनीने गर्वाने तो आवाज ऐकला.

घंटा, प्रथम एक वर्ष आधी ८ जुलै १७७६ ला वाजवली होती.

ती प्रथम तेव्हा वाजवली गेली होती जेव्हा स्वातंत्र्याची घोषणा अमेरिकी लोकांनी प्रथम ऐकली होती.





जॉनीने वडिलांच्या शेतातील माल विकण्यास मदत केली.

मग ते रिकामे ड्रम आणि रिकामी पोती एका धर्मशाळेत घेऊन गेले.

जॉनी आणि त्याचे वडील रात्री आराम करून दुसऱ्या दिवशी सकाळी घरी परत जाणार होते.

अचानक, एक माणूस गुपचूप अंधारातून बाहेर आला.

त्याने जॉन मिकलीला एकीकडे खेचले आणि त्याने त्याच्या कानात काहीतरी कुजबुजला.

त्या अनोळखी माणसाला काय हवे होते?

जेव्हा अनोळखी माणूस निघून गेला, तेव्हा जॉन मिकली आपल्या मुलाजवळ गेला.

मग तो जॉनीकडे वाकला आणि तो म्हणाला.

“बाळा, आज काही जरुरी काम आले आहे.
तू मला चार वाजता धर्मशाळेच्या समोर भेट.”

“काय झालं आहे,बाबा?” जॉनीने विचारले.

जॉन मिकलीने आपला आवाज हळू केला.

“आपल्या कार्यक्रमात थोडा बदल झाला आहे.
आपण आज दुपारीच फिलाडेल्फिया सोडू.”

जॉनीने बोलणे सुरु केले.

पण बाबांनी एका बोटाने त्याचे ओठ दाबले.

मग जॉनी काही न बोलता तिथून निघून गेला.





जॉनी धर्मशाळेच्या बाहेर बसला आणि लोकांना इकडेतिकडे जातांना बघत राहिला.

त्याने घोषणा करणाऱ्या शहराची घंटाही ऐकली.

तो परत ‘ओल्ड इंडिपेंडेंस’ घंटेचा आवाज ऐकू इच्छित होता. पण ती घंटा परत वाजली नाही.

शेवटी त्याने वडिलांना गाडीबरोबर येतांना बघितले..

गाड़ी, घासाच्या मोठ्या पेंढीने भरलेली होती.

जॉनी बाहेर रस्त्यावर धावला आणि सीटवर बसला.

“बाबा, आपण हा घास का वाहून नेत आहोत?” जॉनीने विचारले.

जॉन मिकलीने परत एकदा आपले बोट आपल्या ओठांवर ठेवले.

चुपचाप, ते विटांच्या उंच घरासमोरून ते निघून गेले.

सगळ्यांचे शटर बंद होते.

ते शहर सोडणाऱ्या इतर गाड्यांच्या मागे-मागे गेले.

त्या गाड्यांमध्ये वरपर्यंत सामान भरलेले होते.

थोड्यावेळा नंतर जॉनीच्या वडिलांनी बोलणे सुरु केले.

ते म्हणाले की ब्रिटिश सेना फिलाडेल्फियावर कब्जा करणार होती.

जनरल जॉर्ज वाशिंगटनची सेना त्यांना रोखण्याचा प्रयत्न करत होती.

पण ब्रिटिश सेना खूप मजबूत होती.

म्हणून खूप सारे लोक शहर सोडून पळत होते.

ब्रिटिश सैनिक फ़िलाडेल्फ़िया पोहचल्यानंतर काय करेल?” जॉनीने विचारले.

“ती निश्चितपणे काही चांगले करणार नाही,” जॉन मिकली म्हणाले.



जॉन यांनी सांगितले की इंग्रजांनी फिलाडेल्फियाच्या घंट्या वितळण्याची योजना केली होती.

ते त्यातल्या धातूचा उपयोग बंदुक आणि तोफ्यांचे गोळे तयार करण्यासाठी करणार होते.

“पण तू आणि मी त्यांना रोखण्यासाठी मदत करणार आहे,” जॉन मिकली म्हणाले.

जॉनीने आपल्या वडिलांकडे बघितले.

जॉन मिकली हसले आणि त्याने आपल्या मुलाला डोळा मारला.

मग जॉनी वळला आणि त्याने गाडीमध्ये भरलेल्या घासाकडे बघितले.

“त्यात एक घंटा लपवली होती का?”


त्याच्या वडिलांनी मान हलवली.

“देशाची सगळ्यात महत्वाची घंटी,” त्यांनी गर्वाने म्हटले.

‘ओल्ड इंडिपेंडेंस’ जॉनी उत्साहाने थरथरला.

त्यांच्या गाडीत सगळ्यात प्रसिद्ध घंटा होती.

शेवटी तो हिरो होणार होता.



जॉनी आणि त्याचे वडिल जवळजवळ शहराच्या बाहेर आले.

तेव्हा त्यांनी घोड्यांच्या खुरांचा आवाज ऐकला.

जॉनीने आपल्या वडिलांकडे सतर्कहोऊन बघितले.

दोन घोडेस्वार त्यांच्या गाडीजवळ पोहचले.

ते ब्रिटिश सैनिक होते.

जसे ते जवळ आले तसे जॉनीने सरळ पुढे बघितले.

त्यानंतर सैनिकांनी त्यांच्या गाडीकडे परत वळून बघितले. नाही.



संध्याकाळ होत आली.

इतर फार्म वैगन मिकलीच्या गाड़ीबरोबर आल्या.

त्याच्यात घंटा लपवल्या होत्या.

सगळ्या वैगन नॉर्थम्प्टन टाउन जात होत्या.

एक छोटे शहर त्या लपवण्यासाठी चांगले ठिकाण होते.

फ्रेडरिक लीजर हा मिकलि परिवाराचा शेजारी होता.

वोतो त्यांच्यातली एक वैगन चालवत होती.

तो मिकलिच्या गाड़ीजवळ आला.

“इंग्रज त्या भागात गस्त घालत आहेत,” त्याने धोक्याची सूचना दिली.

जॉन मिकलीने एक क्षण विचार केला.

"चला आपण आतला रस्ता घेऊ या,” ते म्हणाले. “आपण सुरक्षित वेळ आली की परत भेटू शकतो.”

“मी इतरांना पण याबाबत सांगेन,” शेतकरी लीजर म्हणाला.

"तुम्ची खूप कृपा होईल!"





जॉनी आणि त्याचे वडील एकटे अंधारातून जंगलातून निघाले.

जॉनी ब्रिटिश सैनिकांवर आपली नजर ठेवून होता.

प्रत्येक आवाज आणि हरकत त्याला सावध राहण्यास मजबूर करत होती.

“बाबा, जर इंग्रजांनी आपल्याला पकडले तर काय होईल?”

“बाळा, ते तसे करणार नाही,” जॉन मिकली म्हणाले.

तेव्हा जॉनीला झाडांतून एक आवाज ऐकू आला.

“तिथून कोण जात आहे?” कोणीतरी ओरडले.

काही अंतरावर दोन ब्रिटिश सैनिक दिसले.

ते गाड़ीकडे येत होते.

जॉनी फक्त घंटेबाबत विचार करू शकत होता.


सैनिक घंटा नक्की शोधतील.


आता त्याला बाबांना मदत करायला पाहिजे.
मग जॉनीने लगाम सांभाळले.

“तुम्ही झोपले आहेत, असे पडा तुम्ही बाबा”
जॉनी म्हणाला.

जॉनीला माहीत होते की सैनिक फक्त मोठ्या
माणसांना प्रश्न विचारतात.

कदाचित ते छोट्या मुलाला सोडून देतील.





त्यांच्यातला उंच शिपाई जॉनीजवळ आला.

“बघा, एक छोटा मुलगा गाडी चालवत आहे,” त्याने त्याला चिडवले.

“तू या आतल्या रस्त्यावर काय करत आहेस?” त्याने विचारले.

जॉनीने लक्ष न देण्याचा प्रयत्न केला.परंतु त्याच्या पाठीवर घाम वाहत होता.

त्याने प्रयत्न केला की त्याच्या थरथरणारया शरीराकडे सैनिकांचे लक्ष जाऊ नये म्हणून.

“वाटते की मी चुकलो आहे सर,” त्याने शांतपणे सांगितले.

“मी माझ्या वडिलांना विश्रांती देण्याचा प्रयत्न करत होते.”

मग शिपाई हसले.

"चल, वळ आणि पुढे जा,” ते म्हणाले.

"मुख्य रस्ता दक्षिणकडे एक मैल दूर आहे.”

“हो, सर," जॉनी म्हणाला.

जॉनीने हळूहळू मुख्य रस्त्याच्या दिशेने गाडी चालवली.

त्याला सैनिकांना हे दाखवून द्यायचे होते की तो घाबरलेला नाही.

जॉन मिकलीने आपले डोळे उघडले.

त्यांना अभिमान वाटला.

“तुझा विचार खूप चांगला निघाला,बाळा,माझ्या विश्वास आहे की तू खूप साहसी आहेस. तू एकट्याने ती घंटी वाचवण्याचे चांगले काम केले.”

जॉनी सरळ बसला.

त्याला स्वतःला एक हिरो सारखे वाटत होते.



जॉनी आणि त्याचे वडील शेवटी घाटातून जाणाऱ्या इतर शेतकऱ्यांना परत भेटले.

थंड पाऊस होऊ लागला.

जॉनीने आपले जैकेट करकचून बांधले.

शेवटी,ते एका मातीच्या डोंगरावर पोहचले.

जॉनीने तिथे एक अद्भुत नज़ारा बघितला.

खाली रस्त्यावर एक विशाल मालगाड़ी जात होती. लीजर शेतकरी आता मिकलीच्या गाडीजवळ आला होता.

“आपण आता सुरक्षित आहे,” तो म्हणाला.

“हा भाग जनरल वाशिंगटनची सेनेचा आहे. आपण त्यांच्या बरोबर प्रवास करू शकतो.”





जॉनी आणि त्याचे वडील सेनेच्या वैगन ट्रेनमध्ये सामील झाले. सैनिकांनी जॉनीला त्या लढाईच्याबाबत सांगितले ज्या त्यांनी लढल्या होत्या.

त्यांनी त्याला सांगितले कि त्यांनी अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठी कसे मिळून काम केले होते.

जॉनीने पण खूप मेहनत केली होती.

तो "ओल्ड इंडिपेंडेंस" घंटी वाचवण्यासाठी मदत करत होता.

तो ती प्रसिद्ध घंटीबरोबर घरी पोहचण्याची अजून वाट बघू शकत नव्हता.

पाच दिवसांनंतर, वैगन ट्रेन बेथलहम नावाच्या एका गावात पोहचली.

नॉर्थम्प्टन टाउन तिथून काही तासांच्या अंतरावर होते.

मिकलीची गाड़ी या शहराच्या काठी असणाऱ्या डोंगरावर चढली.

तेव्हा जॉनीला जोरात काहीतरी पडल्याचा आवाज ऐकू आला.


त्यांची गाडी एक झटका देऊन थांबली.

जॉनीने खाली उडी मारली आणि त्याने घोड्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला.

त्याच्या वडिलांनी मान हलवली.

"गाड़ीचे पहिले चाक तुटले आहे," ते म्हणाले.





“आपण घंटेला अजून पुढे घेऊन जाऊ शकणार नाही,” त्यांनी फ्रेडरिक लीजरला बोलावले.

त्यांनी आपल्या शेजाऱ्याला घंटा नॉर्थम्प्टन टाउनला घेऊन जायला सांगितले.

जॉनी निराश झाला.

“आपण उद्या चाक ठीक करू शकत नाही का?” त्याने विचारले.

“मग आपण स्वतःच नॉर्थम्प्टन टाउनला घंटा घेऊन जाऊ शकू.”

जॉन मिकलीने आपली मन हलवली.

“हे खूप जोखमीचे काम आहे बाळा, शहरात एखादा ब्रिटीश हेर असू शकतो. ‘ओल्ड इंडिपेंडेंस’ आज रात्री कुठेतरी लपवायला हवी.”

जॉनीला आपले अश्रू रोखता आले नाही.

ते आता फक्त घास भरलेली गाडी घेऊन घरी परत जातील

मग तो हिरो कसा होणार?

जॉन मिकलीने आपल्या मुलाचा दंड दाबला.

"धीर धर बाळा, गोष्टी ठीक होतील.”

मग काही लोकांनी मिळून जड घंटा

फ्रेडरिक लीजरच्या वैगनमध्ये ठेवली.

जॉनीला फ्रेडरिक लीजरची वैगन दूर जातांना बघवली नाही.





जॉनी आणि त्याच्या वडिलांनी आपली गाडी नीट केली.

मग ते दुसऱ्या दिवशी नॉर्थम्प्टन टाउनकडे रवाना झाले.

जॉन मिकली आपल्या शेताकडे गेले नाही.

त्याऐवजी ते शहराकडे वळाले.

“आपण कुठे जात आहोत,बाबा?” जॉनीने विचारले.

“तू बघच,” जॉन मिकली म्हणाले..

मग ते जीऑन रिफॉर्म्ड चर्च समोर येऊन थांबले.

“माझ्याकडे तुला दाखवण्यासाठी काही आहे,” जॉनीचे वडील म्हणाले.

जेव्हा त्यांनी दरवाज्यावर थाप मारली तेव्हा रेवरेंड ब्लूमर यांनी चर्चचा दरवाजा उघडला.

रेवरेंड यांनी आपले दोन्ही हात हलवले आणि ते जॉनीकडे बघून हसले.

“ओल्ड इंडिपेंडेंस” सुरक्षित आहे, आणि त्यासाठी तुला आणि तुझ्या वडिलांना खूप खूप धन्यवाद.”

रेवरेंड ब्लूमर खाली वाकले.

त्यांनी फरशी बाजूला केली,चर्चच्या फरशी खाली मोठी घंटा ठेवलेली होती.

तिचा कांस्य धातु चमकत होता.


जॉनी घंटीवर लिहलेले वाचू शकत होता.

त्याने ते शब्द जोरात वाचले.

“पूर्ण देशामध्ये स्वातंत्र्याची घोषणा होवू दे.”

रेवरेंड ब्लूमर यांनी जॉनीची पाठ थोपटली.

“जेव्हा आपण आपले स्वातंत्र मिळवू तेव्हा ही घंटा परत फ़िलाडेल्फ़ियाला जाईल.



“तुझ्यामुळे आणि तुझ्या वडिलांमुळे ‘ओल्ड इंडिपेंडेंस’ स्वातंत्र्यासाठी परत वाजेल.”

घंटा लपवण्यापूर्वी जॉनीने शेवटचे प्रेमाने स्पर्श केला.



जॉनी आणि त्याचे वडील त्या ऐतिहासिक घंटेला लपवण्याच्या जागेवर घेऊन जाऊ शकले नव्हते.

पण त्यांनी तिच्या या प्रवासाला नक्कीच मदत केली होती.

एक एकटा सैनिक युद्ध जिंकू शकत नाही.

एक एकटा मुलगा घंटा वाचवू शकत नाही.

जर सर्व लोकांनी मिळून काम केले तर एक दिवस ते अमेरिकेला नक्कीच स्वतंत्र्य करू शकतील. असा जॉनीला विश्वास होता.

अंत के शब्द



जॉनीच्या काळात ज्या घंटेला 'ओल्ड इंडिपेंडेंस' म्हटले जात असे, तिला आज 'लिबर्टी बेल' नावाने ओळखले जाते. सप्टेंबर १७७७ मध्ये जीऑन रिफॉर्म्ड चर्चमध्ये 'लिबर्टी बेल' बरोबर फिलाडेल्फियाच्या दहा इतर घंटा लपवल्या होत्या. कर्नल बेंजामिन फ्लावर्सला फिलाडेल्फियातून घंटा हटवण्याचे आणि त्यांना सुरक्षित स्थानावर नेण्याचे काम सोपवले होते. त्यांनी शेतकऱ्या कडून गुप्त पद्धतीने घंटा आपल्या वैगनमधून शहराच्या बाहेर नेण्यास सांगितले.

असे सामान्यपणे मानले जाते की, मिकलिने 'लिबर्टी बेल' ला फिलाडेल्फियाच्या बाहेर काढले आणि मग जेव्हा त्यांची गाडी बिघडली तेव्हा त्यांनी ती फ्रेडरिक लीजरकडे सोपवली. पण काही लोकांचे हे म्हणणे आहे की फ्रेडरिक लीजर, फिलाडेल्फियाहून घंटा गाडीतून घेऊन आला होता.

लिबर्टी बेल श्राइनमध्ये 'लिबर्टी बेल' बाबत एक लेखपट्टी आहे. ते एलेनटाउन (नॉर्थम्प्टन टाउनच्या पूर्वेला), पेन्सिलवेनियामध्ये जीऑन रिफॉर्म्ड चर्चच्या तळघरात आहेत. लेखपट्टी त्या भूमिकेचे वर्णन केले आहे ज्यात जॉन मिकली आणि फ्रेडरिक लीजर यांनी, घंटा वाचवण्याची भूमिका निभावली होती.ती खूप अशी कहाणी आहे जी तुम्ही यात वाचली आहे. आपल्याला माहित आहे की ११ वर्षाचा जॉनी मिकली आपल्या वडिलांबरोबर फिलाडेल्फियाचा त्या प्रवासाला गेला होता. अर्थात, त्या प्रवासात तरुण जॉनीची भूमिका अज्ञात आहे, आपण घंटा वाचवण्याच्या त्याच्या भूमिकेची फक्त कल्पना करू शकतो.

क्रांतिकारी युद्धानंतर लिबर्टी बेल फिलाडेल्फियाला परत केली. २४ ऑक्टोबर १७८१ला यॉर्कटाउनच्या लढाईत अमेरिकेच्या विजयानंतर त्याची सुरुवात झाली. या लढाईत क्रांतिकारी युद्ध समाप्त झाले आणि अमेरिका ब्रिटिश शासनातून मुक्त केली गेली.

महान घंटा ८ जुलै १८३५ ला तुटण्याआधी महत्वपूर्ण घटनासाठी वाजत असे. २२ फेब्रुवारी १८४६ला जॉर्ज वाशिंगटनच्या वाढदिवस साजरा करण्यासाठी शेवटची वाजवली होती. लिबर्टी बेल, इंडिपेंडेंस हॉलजवळ लिबर्टी बेल सेंटर फिलाडेल्फियामध्ये प्रदर्शित केली आहे. ती अमेरिकेची स्वतंत्रताच्या सर्वात प्रिय प्रतीकांमध्ये एक आहे.